# <u>वसई विरार शहर महानगरपालिका</u>

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १६/०४/२०१६**

**सायं ४.३० वा.**

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.</td><td>ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - नितीन राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>१६/४/२०१६</td><td>मा. श्री. किरण भोईर</td><td>नगररचना विरुध्द किती जनहित याचिका प्रलंबित व पुर्ण आहेत. तसेच अनधिकृत बांधकामांबाबत अधिकाऱ्यांवर दाखल झालेल्या गुन्ह्यांची (F.I.R.) माहिती व त्याच्या प्रती</td><td>१) मा. उपायुक्त - १, २ २) मा. उपसंचालक (नगररचना) ३) मा. सहा. आयुक्त A, B, C, D, E, F, G, H, I</td></tr>
<tr><td>२</td><td>१६/४/२०१६</td><td>मा. श्री. किरण भोईर</td><td>महापालिकेत मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याची नेमणुक झाली आहे काय? अग्निशमन विभागात एरीयल लेडल, हैड्रोलिक प्लॅटफॉर्म इ. अद्यावत उपकरणे आहेत काय? तसेच अद्यावत उपकरणे नसल्यास म्हाडा वसाहत बोळींज व खाजगी विकासकांना ७० मीटर उंच इमारत बांधण्याची परवानगी कोणत्या नियमानुसार दिली याची माहिती.</td><td>१) मा. उपायुक्त - २ २) मुख्य अग्निशमन अधिकारी ३) मा. उपसंचालक (नगररचना)</td></tr>
</table>
अनुमोदक - चंद्रकांत गोरिवले सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td></tr>
<tr><td>३</td><td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>Pravin Prakash,(I.A.S.) Secretary & Mission Director (SBM) Government of India Ministry of Urben Government</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | <table><tr><td>२</td><td>Pravin Prakash,(I.A.S.) Secretary & Mission Director (SBM) Government of India Ministry of Urben Government</td></tr><tr><td>३</td><td>महाराष्ट्र शासन, उपसचिव, नगरविकास विभाग, नवि-२०, मंत्रालय, मुंबई-३२ (शासन परिपत्रक)</td></tr></table> अनुमोदक - **रमेश घोरकना** सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिकेत मालमत्ता कर विभागाची आखणी व बांधणे करणेसाठी मासिक परिश्रमिक तत्वावर करार पद्धतीने सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नेमणुक करणेबाबत. | **<u>ठराव / निर्णय :-</u>** मालमत्ता कराचे उत्पन्न वाढविणेसाठी उपाययोजना तसेच मालमत्ता कर विभागाची आखणी वा बांधणी (Setup & Structure) करण्याच्या अनुषंगाने दि. ८ जाने,२०१६ च्या शासन निर्णयातील अटि व शर्तीनुसार, कर आकारणी व कर संकलन या क्षेत्रातील कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणाऱ्या वर्ग-१ मधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची सेवा करार पध्दतीने मासिक पारिश्रमिक तत्वावर घेण्यास तसेच उक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार मासिक जास्तीत जास्त रु. ४०,०००/- (रुपये चाळीस हजार मात्र.) इतक्या मर्यादेत पारिश्रमिक देण्यास ही महासभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचा सेवाकालावधी आवश्यकतेनुसार पुढे वाढवावा किंवा कसे, याबाबतचा निर्णय मा. आयुक्त यांनी त्यांचे स्तरावर घ्यावा. या वाढीव कालावधीसाठी देय असलेले मासिक पारिश्रमिक अदा करण्यासही ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - प्रशांत राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ५ | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता एकात्मिक पद्धतीने डास/अळीनाशकाकामी विविध उपाययोजना राबविणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय:-** महानगरपालिका हद्दीतील डासांचे निमुर्लन करणेकामी एकात्मीक डास/ अळीनाशक व विविध उपाययोजना राबविणेकरिता तांत्रिक दृष्टीकोनातुन कुशल, नामांकित , व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर या क्षेत्रात काम केलेल्या अनुभवी संस्थाकडुन वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्दी देवून Expression of interest (स्वारस्य अभिरुची) मागविणेकामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - प्रशांत राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ६ | २७९ वा वसई विजयोत्सव साजरा करणेकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे. | **<u>प्रस्तावाचा ठराव/निर्णय:-</u>** वरील प्रस्तावाचे सभागृहात वाचन करण्यांत आले त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला क्रीडा महोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने २०१६ या वर्षी "वसई विजयोत्सव दिन" साजरा करण्यांस मान्यता देणेंत येत आहे. सदर महोत्सवाचे आयोजन च्या वेळी किल्ला बांधणी स्पर्धा, चित्र प्रदर्शन, श्री. वज्रेश्वरी मंदीर ते वसई किल्ला मशाल वाहन रॅली, शोभायात्रा, सांस्कृतीक कार्यक्रम, पारंपारिक खाद्य पदार्थ जत्रा, बक्षिस वितरण, इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्याकरीता विविध समित्या स्थापन करणे, महोत्सवाचे |

| | | |
|---|---|---|
| | | आयोजन करताना हॅन्डबील, निमंत्रण पत्रिका, प्रशस्ती पत्र, सन्मान पत्र, बॅनर्स, बँच, स्टिकर्स, चित्रफित प्रति, माहितीपत्रक छपाई इलेक्ट्रॉनिक मिडीया व वृत्तपत्र जाहीरात करणे, प्रवेशद्धार, लाईटींग साऊंड सिस्टम, व्यासपिठ (स्टेज), मंडप (खाद्य जत्रासाठी), व्हिडीयो शुटींग, फोटोग्राफी, स्क्रिन प्रोजेक्टर, जनरेटर, टेबल, खुर्च्या, कारपेट, पाहूणे कलाकार, व्याख्याते, परिक्षक यांना चहा - नाश्ता व भोजनासह निवास व्यवस्था आणि मानधन, सांस्कृतीक कार्यक्रमाचे मानधन, मशाल यात्रा व शोभा यात्रेत सहभागी होणारी मंडळे, रथ सजावट, मशाल, रांगोळी, गुढी, हत्ती, घोडे उंट पुरविणाऱ्यांना मानधन, चित्ररथ वाहन भाडे, पाणी पुरवठा, स्पर्धकांसाठी रोख पारितोषिके, स्मृती चिन्हे, टी-शर्ट, टोपी, शाल, श्रीफळ, गुच्छ - हार, फटाके, इत्यादी व या महोत्सवासाठी इतर अनुषांगिक आवश्यक बाबींसाठी होणारा खर्च तसेच वसई विजयोत्सव दिन हा कार्यक्रम वसई विरार शहर महानगरपालिका व वसई तालुका कला- क्रीडा विकास मंडळ याचे संयुक्त विदयामाने करणे करीता आजची ही सभा सर्वानुमते रक्कम रुपये ३० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ७ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१६-१७ चा कृती आराखडा अवलोकन करणे व अभियान अंमलबजावणीचा प्रगतीपर आढावा महानगरपालिका मा. सर्वसाधारण सभेमध्ये घेणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णयः-** वरील प्रस्तावात अवगत केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) सन २०१६- १७ कृती आराखडा राबविणे व शौचालयाचे बांधकामे करुन या महत्वाकांक्षी योजनेची महापालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजना व प्रस्तावित उपाययोजना राबविणेस ही सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - कन्हैया भोईर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |